MHJN060010432019

## निशाणी क्रमांक ५ वरील आदेश

१) सदरचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादी क्र. १ व २ यांचे विरुध्द तुर्तातुर्त मनाई ताकीदीसाठी दाखल केलेला आहे.

### *वादी यांचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे,*

२) वादी यांच्या कथनाप्रमाणे, मौजे– लतीफपुर, ता. भोकरदन येथील शेत मिळकत सर्वे क्र. ४२ ज्याचा पुर्वीचा गट क्रमांक ९२ व परत गट क्रमांक ४० क्षेत्र ४ एकर ०७ गुंठे या मिळकतीच्या चतुःसिमा पुर्वेस– येडुबा दाभाडे, पश्चिमेस–रस्ता, दक्षिणेस–अन्ना साळवे व उत्तरेस–रामभाऊ साळवे व भिमराव साळवे याप्रमाणे असुन, सदर दावा मिळकतीस येथून पुढे संक्षेपाकरिता ***"दावा मिळकत"*** असे संबोधणेत आले आहे.

३) वादी पुढे कथन करतात की, मौजे–लतीफपुर (फुलेनगर), ता. भोकरदन येथील सर्वे क्रमांक ४२ असुन, गट एकत्रीकरणामुळे दोन वेळेस बदल झालेले आहे. त्यामध्ये पहिला शेत गट क्रमांक ९२ व दुसरा शेत गट क्रमांक ४० असुन एकत्रीत क्षेत्र ८ एकर १४ गुंठे होते. वादी व प्रतिवादी क्र. १ व २ हे आपसांत चुलत भाऊ असुन, त्याचे दोघांचे वडील मयत झालेले आहे. वादी व प्रतिवादी क्र. १

व २ यांचे वडील मयत असुन, त्यांच्यामध्ये कायमस्वरुपी समान वाटणी झालेली असुन, प्रत्येकाच्या वाटणीवर ४ एकर ७ गुंठे मिळकत आलेली आहे.

४) वादी पुढे कथन करतात की, वादीचे वडिल व प्रतिवादींचे वडील सद्या हयात नसुन, प्रतिवादींची मिळकत व वादींची मिळकत यामध्ये पुर्व–पश्चिम बांध असुन, दक्षिणेस प्रतिवादींचे ४ एकर ७ गुंठे एवढी मिळकत असुन, बांधाच्या उत्तरेस वादींचा हिस्सा आहे. तसेच पश्चिमेस वादी व प्रतिवादी यांना वापरण्यासाठी दक्षिणोत्तर १० फुटांचा रस्ता असुन, वारंवार प्रतिवादी नांगरणी करुन, सदरचा रस्ता मोडतात. व वादींच्या पिकांचे नुकसान करतात. वादी पुढे कथन करता की, वादी हे दरवर्षी नांगरणी व पेरणी करीत असतात. यावर्षी देखील वादींनी नांगरणी व पेरणी करीत असतांना त्यास प्रतिवादी अडथळा करीत आहे. वादीने पोलिस स्टेशन व तहसिल कार्यालय, भोकरदन तसेच तंटामुक्ती समितीकडे अनेक वेळा अर्ज केले, परंतू दरवर्षी प्रतिवादी क्र. १ व २ हे वादीस त्रास देतात. वादी यांनी जिल्हाधिकारी, जालना यांचेकडे तक्रार केली होती. तेव्हा जिल्हाधिकारी यांनी मोजणीचे आदेश दिले व दिवाणी न्यायालयात दाद मागणेस सांगितले.

५) वादी पुढे कथन करतात की, दिनांक २०/०६/२०१९ रोजी वादी हे नांगरणी व पेरणीसाठी जमिन तयार करीत असतांना, प्रतिवादींनी हरकत अडथळा केला. त्यामुळे वादींनी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला असुन, हा तुर्तातूर्त मनाई ताकीदीचा अर्ज दाखल केलेला आहे.

६) प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास निशाणी क्र. १४ येथे म्हणणे दाखल

करुन, तीव्र विरोध दर्शविलेला आहे. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे वादींच्या वादपत्रातील चतुःसिमा चुकीच्या आहेत. प्रतिवादी पुढे कथन करतात की, वादीस जिल्हाधिकारी, जालना यांनी दावा मिळकतीची मोजणी करुन घेण्याचे आदेश दिले. परंतू दावा मिळकतीची स्थितीची खरी वस्तुस्थिती न्यायालयासमोर येईल, म्हणुन वादींनी दावा मिळकतीची मोजणी केली नाही. प्रतिवादी पुढे कथन करतात की, दावा मिळकतीच्या चतुःसिमा या वादीने प्रतिवादीचे रोड लगत मिळकतीवर कब्जा करण्याच्या हेतुने पुर्णपणे चुकीच्या केलेल्या आहेत. वादी व प्रतिवादी यांचे दावा मिळकतीमध्ये उत्तर–दक्षिण बांध असुन, बांधाच्या पुर्वेकडील वाटणी ही वादीची व पश्चिमेची वाटणी ही प्रतिवादी यांची याप्रमाणे वाटण्या झालेल्या आहे. तसेच प्रतिवादी यांचे हिस्सास आलेल्या मिळकतीचे पश्चिमेकडुन हसनाबाद–तळेगांव रोड आहे व प्रतिवादीचे वाटणीस आलेल्या क्षेत्राच्या पुर्वेस वादीची वाटणीस मिळकत आहे.

७) प्रतिवादी पुढे कथन करतात की, वादी हे मिळकत विकण्याच्या उद्देशाने त्यांची मिळकत रोड लगत आहे, असे दर्शवित आहे. वादीने दाव्यात नमुद केलेल्या चतुःसिमा चुकीच्या आहेत. त्यामुळे वादींचा प्रस्तुतचा तुर्तातूर्त मनाई ताकीदाचा अर्ज नामंजुर करावा अशी प्रतिवादींनी विनंती केलेली आहे.

८) वादी यांची तुर्तातूर्त मनाई अर्जातील कथने तसेच प्रतिवादी यांचे म्हणण्यातील कथने तसेच वादीतर्फे सन्माननिय विधिज्ञ व प्रतिवादी तर्फे सन्माननिय विधिज्ञ यांचा सखोल युक्तीवादाचे अवलोकन करुन, खालील वादप्रश्न माझे निदर्शनास आले. सबब, मी खालील वादप्रश्नांचे त्याखाली दिलेल्या कारणांसहित

निष्कर्ष नोंदवले आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | प्रथमदर्शनी केस वादी यांचे बाजूने आहे असे वादी शाबित करतात काय ? | **नकारार्थी** |
| २) | न्यायाचा समतोल वादी यांचे बाजूने आहे असे वादी शाबित करतात काय ? | **नकारार्थी** |
| ३) | तुर्तातुर्त मनाई आदेश न दिल्यास वादी यांचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता आहे काय ? | **नकारार्थी** |
| ४) | अंतिम आदेश काय ? | **अंतिम आदेशानुसार अर्ज नामंजूर करण्यात आला.** |

## :: <u>का र ण मि मां सा</u> ::

९) सदरचे चारही वादप्रश्न एकमेकांशी निगडीत असल्याने पुराव्याचे विवेचनाची पुनरावृत्ती होवू नये म्हणून ते एकत्रीतपणे चर्चेसाठी घेतलेले आहेत.

**१०) दावा प्रलंबीत असताना तुर्तातुर्त ताकीदीची मागणी मंजूर करणे ही न्यायालयाच्या विवेकाधिन अनुतोषाशी निगडीत असणारी बाब आहे. असा न्यायालयीन विवेकाधिकार वापरताना मा. सर्वोच्च न्यायालय यांनी *<u>Darpat Kumar and another Vs. Pralhad Singh and others (1992) 1 SCC 719</u>* या न्यायनिर्णयामध्ये खालील घटक पडताळून पाहणे आवश्यक आहेत असे मार्गदर्शन केले आहे.**

**(अ) वादीला सकृत दर्शनी बाजू आहे काय ?**

**(ब) न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे काय ?**

**(क) अर्ज नाकारल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे काय ?**

**११)** दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ३९ नियम १ व २ अन्वये तुर्तातूर्त मनाई ताकीदीची समानतेची दाद (Equitable relief) मागणी करीत असतांना वादीतर्फे दावा मिळकतीतील प्रथमदर्शनी कब्जे वहिती शाबीत करणे गरजेचे असते. तसेच वादी यांनी स्वबळावर व दाखल कागदपत्रांच्या आधारे त्यांची प्रथमदर्शनी बाजु शाबीत करणे आवश्यक असते.

**१२)** प्रस्तुत दाव्याकामी दावा मिळकतीचे वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान वाटप १/२ हिस्साप्रमाणे वाटप झाले ही बाब विवादीत नाही. परंतू संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले असता, वादींच्या कथनाप्रमाणे सदरचे वाटप हे दाव्यात कथन केल्याप्रमाणे पुर्व-पश्चिम बांधाच्या उत्तरेस वादी यांची ४ एकर ७ गुंठे मिळकत व दक्षिणेस प्रतिवादी यांची ४ एकर ७ गुंठे मिळकत व दोन्ही पक्षकारांच्या पश्चिमेस दक्षिणोत्तर समाईक रस्ता याप्रमाणे झाले, तर प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे सदरचे वाटप हे सर्वे क्रमांक ४२ मध्ये उत्तर-दक्षिण बांध असुन, पुर्वेस वादीचे क्षेत्र व पश्चिमेस प्रतिवादीचे क्षेत्र याप्रमाणे झाले.

**१३)** एकंदरीत अभिलेखावरील कथनावरुन वादी व प्रतिवादी हे त्यांच्या दरम्यान झालेल्या वाटपाप्रमाणे असलेल्या वहिती बाबत वेगवेगळी कथने करतात.

परंतू वादी हे प्रस्तुत अर्जान्वये तुर्तातूर्त मनाई ताकीदीची समानतेची दाद मागत आहे. त्यामुळे वादपत्रात कथन केल्याप्रमाणे वाटपाप्रमाणे वादी व प्रतिवादींच्या उत्तर-दक्षिणेत वहिती आहेत, हे प्रथमदर्शनी शाबीत करण्याची जबाबदारी ही वादींच्यावर आहे. वादींनी त्यांची प्रथमदर्शनी बाजु स्वबळावर शाबीत करणे गरजेचे आहे. प्रतिवादींच्या कमतरतेवर त्यांची प्रथमदर्शनी बाजु शाबीत झाली, असे म्हणता येणार नाही. वादी यांनी त्यांच्या कथनाच्या पृष्ठार्थ निशाणी क्र. ४/५ येथे दावा मिळकत गट क्रमांक ४० चा ७/१२ उतारा दाखल केलेला आहे. सदर ७/१२ उता-याचे अवलोकन केले असता, वादी व प्रतिवादी यांचे प्रत्येकी १/२ हिस्सास भोगवटादार सदरी नांवे दाखल असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. वादी यांनी निशाणी क्र. ४/६ येथे देखील दावा मिळकतीचा जुना गट क्रमांक ९२ चा उतारा दाखल केलेला आहे. सदर उता-यात देखील वादी व प्रतिवादी यांची नांवे दिसुन येतात. एकंदरीत वादी यांनी निशाणी क्र. ४ सोबत दाखल केलेल्या सर्व कागदपत्राचे अवलोकन केले असता, केवळ वादी व प्रतिवादी यांची नावाची नोंद ७/१२ दप्तरी प्रत्येकी १/२ हिस्साची दिसुन येते. परंतू त्यामुळे वादी यांची वाटपाप्रमाणे गट क्रमांक ४० मधील पुर्व-पश्चिम बांधाचे उत्तरेस वहिती आहे व दक्षिणेस प्रतिवादींची वहिती आहे व त्याच प्रमाणे वाटप झाले होते, हे सिध्द होत नाही. वादीतर्फे निशाणी क्र. ४ लगत १० येथे गट क्रमांक ४० चा नकाशा दाखल केलेला आहे. परंतू सदर नकाशामध्ये ज्या चतुःसिमा त्या संपुर्ण गट क्रमांक ४० च्या आहेत. त्यामुळे वादी कथन करतात की, त्याप्रमाणे वादी व प्रतिवादींची वहिती आहे, हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे अभिलेखावरील संपुर्ण पुराव्याचे अवलोकन

केले असता, वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान जे वाटप झाले, त्या वाटपाप्रमाणे दावा मिळकतीमध्ये पूर्व-पश्चिम बांध असुन, बांधाच्या उत्तरेस वादी व पश्चिमेस प्रतिवादींची मिळकत आहे, हे प्रथमदर्शनी सिध्द होण्याच्या दृष्टीने वादी यांच्या वादपत्राच्या कथनाशिवाय कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर नाही. वादी यांनी त्यांची उत्तरेकडील कब्जे वहिवाट आहे, हे सिध्द करण्यासाठी वहिती बाबत साक्षीदार यांचे शपथपत्र दाखल करणे शक्य होते. परंतू तसे शपथपत्र अभिलेखावर दाखल नाही.

**१४)** वादी यांनी वादपत्रामध्ये ज्या चतुःसिमा दिलेल्या आहेत, त्या संपुर्ण गट क्रमांक ४० च्या असल्याचे स्पष्ट होते. परंतू वादी यांनी प्रस्तुतचा दावा केवळ गट क्रमांक ४० मधील त्यांच्या ४ एकर ७ गुंठे या मिळकतीबाबत दाखल केलेला आहे. अशा परिस्थीतीमध्ये वादी यांनी सदर क्षेत्राच्या चतुःसिमा देणे गरजेचे होते. त्यामुळे दावा मिळकतीबाबत वाद कथनातील दावा मिळकतीच्या वर्णनावरुन प्रथमदर्शनी स्पष्टता येत नाही.

**१५)** वादी व प्रतिवादी यांचे दावा मिळकतीचे वाटप केव्हा झाले, ते तोंडी झाले अथवा त्यांचा दस्ताऐवज झाला, याबाबत कोणतेही कथन अभिलेखावर नाही. वादी कथन करतात त्याप्रमाणे वाटपाप्रमाणे वादी व प्रतिवादी यांची गट क्रमांक ४० मध्ये दक्षिणोत्तर कब्जे वहिती आहे व दोघांच्या मधुन पूर्व-पश्चिम बांध आहे, हे सिध्द होण्याइत प्रथमदर्शनी पूरावा अभिलेखावर नाही. याउलट प्रतिवादी यांनी निशाणी २० सोबत दाखल केलेल्या दिवाणी दावा क्रमांक ६४/२००२ च्या न्यायनिर्णयाचे बारकाईने अवलोकन केले असता, प्रतिवादी ज्या प्रमाणे दावा मिळकतीचे वाटप झाले

आहे, ती बाब वादी यांनी दिवाणी दावा क्रमांक ६४/२००२ या दाव्यामध्ये मान्य केली आहे, हे स्पष्ट होते. सदर दाव्यामध्ये वादीतर्फे साक्षीदार दगडुबा व साहेबराव हे वादी व प्रतिवादी यांची वाटणी ही पुर्व-पश्चिम झाली असुन, पुर्वेकडील वाटणी वादी भगवान व पश्चिमेकडील वाटणी प्रतिवादी यांच्या हिस्साला आहे, असे कबुल करतात, हे सदर न्यायनिर्णयातील कारणमिमांसेवरुन प्रथमदर्शनी स्पष्ट होते. त्याच बरोबर जरी निशाणी क्र.४/५ येथील ७/१२ उता-यातील इतर हक्कात वादी यांना जाणे-येणेचा रस्ता पुर्व-पश्चिम बांधाने नमुद असले, तरी सदरचा बांध हा गट क्रमांक ४० च्या मध्यातील आहे अथवा कडे कडील आहे, हे स्पष्ट होत नाही. त्याअनुषंगाने निशाणी क्र. ३/४ येथील फेरफार कमांक २१९ चे अवलोकन केले असता, वादी यांना त्यांच्या जमिनीत जाण्यासाठी तडजोडीने दिला असल्याचे स्पष्ट होते. जर वादी कथन करतात त्याप्रमाणे उत्तर-दक्षिण अशा वादी व प्रतिवादी यांच्या कब्जे वहिती असत्या, तर वादी यांना त्यांच्या मिळकतीत जाण्यास पश्चिमेकडील रस्ता उपलब्ध होता. त्यांना पूर्व-पश्चिम बांधावरील रस्त्याची आवश्यकता का भासली ? याचे कोणतेही संयुक्तीक कारण वादीतर्फे देण्यात आलेले नाही. त्यामुळे एकंदरीत अभिलेखावरील प्रथमदर्शनी पूराव्यवरुन प्रतिवादी कैफियतीमध्ये कथन करतात त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी यांचे वाटप झाले होते, हे प्रथमदर्शनी स्वीकाहार्य वाटते.

१६) याउपर तहसिलदार, भोकरदन यांनी निशाणी क्र. ३/१५ येथील दाखल आदेशप्रमाणे वादी यांनी दावा मिळकतीची मोजणी का करुन घेतली नाही ? याचे कोणतेही ठोस उत्तर वादीतर्फे देण्यात आलेले नाही. जर तशी मोजणी झाली असती,

तर त्यात वादी व प्रतिवादी यांच्या हद्दी निश्चित झाल्या असत्या. वादी कथन करतात त्याप्रमाणे वाटपाप्रमाणे असलेल्या कब्जे वहिती दाखविण्याबाबत भुमि-अभिलेख नकाशा, वाटपपत्र इ. कागदपत्रे अभिलेखावर नाही. त्यामुळे वादी यांचे दावा मिळकतीतील वादपत्रात कथन केल्याप्रमाणे उत्तरेरकडील कब्जे वहिवाट प्रथमर्शनी शाबीत झालेले नाही, असे हे न्यायालय अनुमान नोंदवित आहे. त्याच बरोबर वादी यांना हरकत अडथळ्याबाबत वादी यांनी पोलिस ठाणे, तंटामुक्ती समिती यांचेकडे दाखल केलेले तक्रारी अर्ज अभिलेखावर नाही. वादी यांनी निशाणी क्र. ४ सोबत दाखल पोलिस निरीक्षक यांना दिलेला अर्ज हा दिनांक ११/०६/२०१८ रोजीचा म्हणजेच वाद कारणापुर्वीचा आहे. त्यामुळे अभिलेखावरील पूराव्यावरुन प्रतिवादी यांनी वादी यांना कब्जे व वहिवाटीस दिनांक २०/०६/२०१९ रोजी हरकत घेतली, हे प्रथमदर्शनी स्पष्ट होत नाही.

**१७)** एकंदरीत अभिलेखावरील पूराव्यावरुन वादी कथन करीत असलेल्या वादी व प्रतिवादीयांच्या वाटपाप्रमाणे वहिती प्रथमदर्शनी शाबीत होत नाही. याउलट प्रतिवादी कथन करतात त्याप्रमाणे कब्जे वहिती दर्शविण्याच्या दृष्टीने बराचसा पूरावा अभिलेखावर आहे. अभिलेखवारील दाखल पूराव्यावरुन वादी यांची प्रथमदर्शनी बाजु सिध्द होत नाही. न्यायाचा समातोल सद्यःस्थितीस वादीच्या बाजुने नाही. तुर्तातूर्त मनाई ताकीद न दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. ***सबब, वादप्रश्न क्रमांक १ ते ३ चे उत्तर हे न्यायालय नकारार्थी नोंदवत असून वादप्रश्न क्रमांक ४ चे उत्तराकरिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.***

## // आ दे श //

वादी यांचा निशाणी क्रमांक ५ वरील तुर्तातुर्त मनाईचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by CHAITANYA SUNILDATTA DESHPANDE
Date: 2022.07.22 16:27:26 +0530

ठिकाण: भोकरदन.
दिनांक:२०/०७/२०२२.

(सी. एस. देशपांडे )
सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर),
भोकरदन.